**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language, Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2026: 8.739,**
https://www.srjis.com/issues_data/295
PEER REVIEWED, REFEREED & INDEXED JOURNAL, JUNE-JULY 2026, VOL-14/76

# चंद्रपूर जिल्ह्यातील मूर्तिकला

**प्रा. शरद रुखमाजी मस्के**
*संत जनाबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड जि. परभणी.*
*rajurwadep9@gmail.com*

**Paper Received On**: 21 JUNE 2026
**Peer Reviewed On:** 25 JULY 2026
**Published On:** 01 AUG 2026

***Abstract***

*भारतात पुरातत्वशास्त्राची व्याप्ती फार मोठी आहे. पुराततव संशोधन जास्त जुने नाही. अलेक्झांडर कॅनिगहॅम यांनी पुरातत्व संशांधनाचा पाया घातला. चंद्रपूर जिल्हयातील पुरातत्व अत्यंत समृध्द आहे. येथे प्रागैतिहासिक ते इतिहास काळापर्यंत मानव वसाहतीचे स्थळे पुरातन व ऐतिहासिक स्मारके, शिलालेख, शैलगृहे, आणि अनेक मूर्ती शिल्पे व दइतर पुरावशेष मिळतात. प्राचीन काळात मौर्य, सातवहान, वाकाटक, नल, शरभपुरीय, राष्ट्रकूट, चातुक्य, परमार, नागवंशीस, माना, यादव या राजवंशानी या भागावर आपले प्रभृत्व गाजविल. त्यावेळचे शिलालेख ताम्रपट, नाणी, स्मारके, मूर्ती व शिल्प उपलब्ध आहेत. चंद्रपूर जिल्हायात पुरातत्वीय संशोधनास वाव आहे. भारतात सुमारे १४०० लेणी आहेत, त्यापैकी सुमारे ११०० महाराष्ट्र ारज्यात आहेत. देशातील व महाराष्ट्रातील बहुसंख्य लेणी या जैन व बौध्द लेणी आहेत. प्राचीन कलावशेषात शैलगृहाणा अन्यनसाधारण महत्व होते. चंद्रपूर जिल्हयात ०२ आणि तिसऱ्या शतकापर्यंत मूर्तीपूजेला व त्याचया प्रतिमेस स्थान नव्हेत. परतुं मौर्यकाळात व नतंरच्या काळात बुध्दमुर्त्या बनत गेल्या. विविध शैलगृहास लोकवर्गणी, लोकश्रय सुध्दा प्राप्त झाला. परतुं पुढे यावर फार प्रकाश पडला नाही.*

***बिजशब्द*** *- पुरातत्व, शैलगृहे, मौर्य, ताम्रपट, नल इ.*

**उदिष्टे** –

1) चंद्रपूर जिल्हायातील बौध्दधर्म शैल्यगृहा चे अध्ययन करणे.
2) महाराष्ट्रातील बौध्द शैल्यगृहे व चंद्रपूर जिल्हायातील शैल्यगृहांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3) बौध्द शैल्यगृहेर लेणी मूर्तिकला सोबतच इतर समकालीन पुरातत्वीय शिलालेखांचा अभ्यास करणे.

**गृहितके** –

1) चंद्रपूर जिल्हायातील बौध्द धर्माचा प्रचार प्रसार व्यापार शैलगृहाच्या माध्यमातून झाला.
2) बौध्द शैल्यगृहाची रचना वैशिष्टेपूर्ण आहे.
3) चंद्रपूर जिल्हात बौध्द शैल्यगृहे मौर्यकाळापासून ते आठव्या शतकापर्यंत विकसित होत होते.
4) बौध्द मूर्तीकलेचा प्रभाव ईतर धमौयांच्या मूर्तीकलेवर दिसतो.
5) चंद्रपूर जिल्हायात बौध्दमूर्तीकला व शैलयगृहाना जास्त मिळला.

*Copyright@2026 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**चंद्रपूर जिल्हायातील बौध्दधर्म** –

चंद्रपूर जिल्हायात बौध्द धर्माची मुहूर्तमेढ इ.स. २-३ शतकात रोवल्या गेली. असे नागभिड तालुक्यातील देवटेक येथे सापडलेल्या शिलाजलेखालेखावरून समजते. त्यात पाचव्या शिलालेखात बौध्द धर्माच्या प्रचारार्थ एका धर्ममहामात्राची (अमात्याची) नेमणूक केली होती. भद्रावती येथील विजासन लेणी अवशेषांवरून ही लेणी हिनयानांनी कोरलेली होती असे दिसते. चिनी प्रवासी हयुनएन त्याग यांच्या मतानुसार भादंक (भद्रावती) येथे अशोककालीन एक संघाराम व स्तूप होता. हयावरून या जिल्हायात हिनयान पंथीयाचे अनुयायी होते असे दिसते. सातवहानकाळात बौध्द धर्माचा विकास झाला. परतुं वज्रयान पथांचे सबंधी अवशेष मिळत नाही. नतंर पाचण्या व सहाण्या शतकास बौध्द महायानांची संख्या वाढली. पादुवंशी उदयनचा नातू भवदेव याने सुगत धामाचा म्हणजे विजासन टेकडीचा वरील बौध्द मंदिराचा जिणध्दिार केल्याचा उल्लेख आढळतो. चंद्रपूर जिल्हयातील भद्रावती येथे विहार, वायी, कुप सभीावन, चैत्य बांधल्याचा उल्लेख आढळतो. तसेच सातवाहन, वाकाटक, पादुंवंशी यांच्या शासनकाहात कुनघाडा, माना, देऊळवाडा आणि घुग्गुस येथे बौध्द भिक्खूच्या निवासाकरीता विहार कोरली असावीत. १९८१ मध्ये बल्लापूर येथे बौध्द प्रतिमा सापडल्या आहेत. म्हणजेच दुसऱ्या शतकापासूनचे ते आठण्या शतकापर्यंतचे बौध्दधर्मीय पुरावे आढळतात.

विशेषत: विष्णूच्या दशावतार शिल्यात बुध्दमूर्ती घडविल्या जात असे. आणि काळात बुध्दांची मूर्तीरूपात पूजन होत होती हे स्पष्ट होते. गुफा स्थापत्य कला रोम, इजिप्त, किंवा दइराण आणि तुर्कस्थान मधून उगम पावली असे मत माडंले जात असले तरीही येथील नैसागिकरित्या निर्माण झालेल्या प्रागैतिहासिक गुफा स्थापत्यावरून फार प्राचीन काळापासून येथील मानवाला त्यांचा वापर व महत्व अवगत होते असे दिसते. त्यांच्या निर्मितीसाठी त्या-त्या काळातील कलाकाराने घेतलेले परिश्रम, तंत्रज्ञान, द्रण्य आणि तत्कालीन अभियांि९क ही कल्पनातीत अशीच म्हणावे लागते. या सर्वांच्या आणि परंपरागत संप्रदाय याचा संगम यातून शैलगृहांना अप्रतिम कलाकृतीचे स्थान प्राप्त झालेले आहे.

भद्रावतीपासून ०३ कि.मी. विजासन नावाच्या टेकडीत तीन शैलगृह कोरली आहेत. या लेणीचा सर्वात प्रथम सुप्रसिध्द पुरातत्वज्ञ कनिंग हॅम योने आपल्या भारतीय पुरातत्वीय सर्वेक्षण अहवालात उघड करून ही लेणी उजेडात आणली. इ.स. च्या सातव्या शतकात सुप्रसिध्द चीनी यात्रेकरू हुएनत्यंग येथे येऊन गेल्याचाही उल्लेख आढळतो.

विजासण लेणी बोगदयासारखी आहे. तीन शेलगृहे तीन दिशांना कोरलेले आहेत. मधल्या प्रवेशव्दारांचे शैलगृह पूर्वेभूमिख उत्तरभिमूख व दक्षिणाभिमूख आहेत. ही लेणी पाषाणात कोरलेली आहे. लालसर वालुका पाषाण प्रकारातील आहे. या लेणीत असानस्थ बुध्द प्रतिमा आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील भाजा, कार्ले किंवा अन्य लेण्यांप्रमाणे सभागह किंवा चैत्यगृह नसून ती सरळपणे कोरलेली आहे. उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील लेणी २० मी. लांबीचा आहे. १.७०x१.१५ से.मी. आकारात असानस्थ ध्यानमुद्रेत बुध्दांची मूर्ती आहे.

लेणीत प्रवेश करण्यापूर्वीच दर्शनी भागात येण्याजाण्याच्या मार्गाच्या दोन्ही बाजूस सुमारे १० देवकोष्टे कोरलेली आहेत. हयात उत्तरेकडीलन भागावर दोन स्तूप कोरलेली आहेत. परंतु ऊन वारा, पावसामुळी ती सध्या अस्पष्ट आहे. लेणीच्या दर्शनी भागाच्या पहाडाच्या वस्टया भागात तीन स्तूप कोरली आहेत. मधल्या स्तूपाचे सपूंर्ण अकंन अण्डभाग, हर्मिका, छत्रावली इ. अगदी स्पष्ट दिसतात काही इतिहासकार म्हणतात की, या लेणीस दान देणारा नृपती (राजा) हा विजय सातकर्णी असावा. याच्या पृष्टीसाठी १८९९ मध्ये ब्रम्हपुरी जवळ मिळालेल्या सातवहान राजांच्या१८३ नाण्यांचा उल्लेख करतात. विजय सातकर्णी हा नागार्जुनाचा मित्र व संघाराम दान देणारा विजय सातवहान एकच असावा. विजयाच्या

नावा वरून संघारमाचे नाव विजासन म्हणजे विजयाने दिलेले असन (आश्रय) नसण्याचे राहण्याचे ठिकाण असे पडले. आणि त्यानंतर या शबदाचा अपभ्रंश 'विजासन' असे पडले. त्यांच्यात काळात या लेणीचे रूप महायानी झाले. प्राप्त पुरारण्यावरून सदर मुळची हिनयानी असलेल्या लेणीचे रुपातंर इ.स. दुसऱ्या शतकात विशाल बौध्दमूर्ती तिथे स्थापून हीर लेणी महायानी झाली.

महायान काळात आवश्यकतेनुसार खोदून त्यात कक्षतयार करून कक्षासन आणि त्यावर सीमात पट्टीका आणि त्यावर आसनस्त (पदमासनात) बुध्दमूर्ती कोरली आहे. या कक्षातील पाणी बाहेर पडावे म्हणून कूपलीकेची योजना केलेली आहे. या कक्षातील पाणी बाहेर पडावे म्हणून कूपनलीकेची योजना केलेली आहे. तसेच प्रवेशव्दारावर काष्टपट्टीका अडकविण्याकरीता भिंती घासून थोड्या गुळगुळीत केलेलया दिसतात. भद्रावाती येथील १९९५ पर्यंत काही गुफा सपूंर्ण गाळानी भरलेल्या होत्या. गुफेतील बुध्द शिव तेवढेच दिसत होते. परंतु लेणीतील गाळ काढल्यानंतर एकासमात कोरलेली रोद्र भावी देवीची प्रतिमा सापडलेली आहे. काही विद्वान त्यास चामुंडा मूर्ती म्हणतात. एका ठिकाणी बोधीसत्वाची मूर्ती सापडली आहे. ही मूर्ती वालूकापाषाणात आहे. या मूर्तीचा बेबीपासूनचा वरचा भाग शिल्लक असून दोन्ही हात खंडीत आहेत. शिर्षाचया मागे तीन स्तरातील हारयष्टी अलंकृत प्रभामडंल आहे. डोक्यात उष्णीय, लांब कान, भुवयांची लाबंट ठेवण पूर्ण उघडे डोळे सरळ नाक असे विलोभनीय भाव आहेत. ही मूर्ती पांडूवंशीय भवदेव यांच्या काळात घडविली असावी. म्हणून या मूर्तीला अन्यनसाधारण महत्व आहे.

**बल्लापूर येथील मूर्ती** –

बल्लापूर पासून ०६-०७ कि.मी. अतंरावर असणाऱ्या कारखा येथील जगलांत सन १९८१ मध्ये स्थानिक नागरिकांना बुध्द मूर्ती सापडली. ही मूर्ती वालुका पाषाणात आहे. ती १ मीटर उंच आणि ८४ से.मी. रूंद आहे. या मूर्तीत भगवान बुध्द धम्मचक्रप्रवर्तन मुद्रेत असून पयर्चकासनात बसलेले आहे. त्यांच्या पायांचे तळवे वरती दिसतात. बुध्दाचा उजवा खांदा उघडा असून डाण्या खाद्यावरून गुडग्यापर्यंत वस्त्राने झाकलेले आहे. बुध्दाचा चेहरा गोल असून कान अधिक रूदं वाटतात. डोक्यावर उष्णीय आहे. सरह नाक आणि अर्धोन्मलिनत नेत्रामुळे मूर्ती विलोभनीय वाटते. मूर्तीशास्त्रीय या मूर्तीचा काळ इ.स. ०८ वे ०९ वे शतक ठरवितात. ही मूर्ती घडविण्याचे काय प्रयोजन होते आणि ता एका भण्य शीळेवर कोरून दुरावस्थेत का ठेवण्यात आली आदी प्रश्न अनुत्तरीत राहतात. ही मूर्ती महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्वीय विभागांनी ताब्यात घेऊन ती आता नागपूर येथील मध्यवर्ती सग्रंहालयात सुरक्षित ठेवण्यात आली आहे.

**बौध्द धर्माचे सबंधित शैल्यगृह** –

कुनघाडा शैलगृह चंद्रपूर जिल्हयातील नागभिड तालुक्यातील मोहाळी (मोकासा) पासून काही अतंरावर एकाच पहाडात एकुण पाच शेलगृहे आहेत. स्थानिक लोक त्यास पाडंव गुफा म्हणतात. शैलगृहे आहेत. स्थानिक लोक त्यास पाडंव गुफा म्हणतात. दोन शैलगृहात कोरीव लेख कोरलेले आहे. ही पाच शैलगृहे अगदी साध्या पध्दतीची आहे. कुठल्याही प्रकारचे अलंकरण, भौमितिक नक्षी नाहीत. तसेच येथे कुठल्यही मूर्ती कोरलेल्या नाहीत. किंवा स्थापीत केल्या नाहीत. ही शैलगृहे वालुका पाषाणात आहे. भाजा, कार्ले, जुन्नर, नाशिक पितळखोरे किंवा अन्य ठिकाणाच्या लेण्याप्रमाणे भण्य-दिव्य नाहीत. या शैल्यगृहांच्या स्थापत्य रचनेचा सर्व अंगोपंगाचा विचार करता ती बौध्द भिक्खूना वर्षासन काळात निवास व्यवस्था म्हणनूच ती कोरण्यात आली असावीत. काही इतिहासकार, विद्वानांच्या मते, अश्या प्रकारच्य गुफा या प्रतिस्थीत व्यक्तीच्या स्मरणार्थ कोरण्यात आल्या असाव्यात. कोरलेल्या शिलालेखांवरून सदर शैलगृहांचा काळ इ.स. २-३ शतक निश्चित करता येईल.

कुनघाडयापासून पवनी येथील सदर शैल्यगृह ४५ कि.मी. अतंरावर आहे. आणि देवटेक १३ कि.मी अतंरावर आहे. पवनी आणि देवटेक येथे अशाककालीन शिलालेख मिळाले यावरूनवरील शैल्यगृह

भिक्खूच्या निवासाकरीताच कोरलेली असावीत असे वाटते. तसेच शैल्यगृहातील कक्षासनासारख्या उंचवटयावरून याचा उपयोग निवासाकरीता होत असावा असे दिसते. शिलालेखातील उल्लेखावरून सदर शैलगृहे ही शिवसवामीच्या मुलांनी कोरलेले असावे, तो त्या काळातील श्रेष्टी किंवा गृहपती असावा. त्याने बौध्द भिक्खूकरिता दान स्वरूपात शैल्यगृहे कोरली असावीत.

**घुग्गुस येथील गुफा** –

घुग्गुस गावाच्या पश्चिमेस एक कि.मी. अंतरावर तीन एकाश्मात तीन गुफा आहेत. ह्या गुफा सातव्या आठवया शतकात कोरल्या असाण्यात. एका गुफेत भैखांची मूर्ती कोरलेली आहे. स्थानिक लोक त्यास 'बैरमबाबा' असे म्हणतात. या तिनही गुफा या उत्तराभिमूख आहेत. प्रवेशव्दार १.४० मी. उंचीचे आहे. तसेच २.१०x२x१० मी. लांबी रूदींच्या आणि १.४० मी उंचीच्या आहेत. सदर लेणी बौध्दभिक्षुच्या निवासाकरिता प्रवासी व्यापारी यांच्या निवाऱ्याकरीता कोरलेली असावी. या गुफा अन्य अलंकरण विरहीत आहेत. क्रमांक एकच्या गुफेतील मूर्तीशिवाय अन्य गुफेत कुठल्याही प्रकारची मूर्ती किंवा अलंकरण् कोरलेले दिसत नाही.

**माना ता. जि. चंद्रपूर येथील शैलगृहे** – चंद्रपूर शहरापासूनप काही अतंरावर इराई-झरपट नदीच्या सगंमावर माना नावाने प्रसिध्द लेणी समुह आहे. त्यात पाच शैलगृहे आहेत. सदर लेणीत कुठेही कक्षासने नाहीत. पाच शैलगृहापैकी चार शिललक आहेत. सर्वच शैलगृहात मूर्ती किंवा शिलय नाहीत. प्रवेशव्दाराजवळ कमळ व देवकोष्ट कोरलेले आहे. ही लेणी उत्तर-दक्षिण १५ मी. लांबीच्या आणि सुमारे ०३ मी. उंचीच्या वालुकापाषाणात आहे.

**देऊळवाडा ता. भद्रावती** – देऊळवाडा हे गाव भद्रावतीपासूना ११ कि.मी. अंतरावर आहे. चंद्रपूर जिल्हा गॅझेटीयर ग्रंथानुसार येथे अनेक शैलगृहे होती. सध्या सहा शेलगृहे आहेत. या शैलगृहास कोरण्याची पध्दत अत्यंत ओबड-धोबड आहे. हे शैलगृहे पूर्वाभिमूख आहेत. तीन नबंरच्या शैलगृहात शंखलिपीतीला शिलालेख आहे. या गुफेचा उल्लेख नरसिंह गुफा म्हणून करतात. एका गुफेत प्रवेशव्दारावर पंचाआरती घेतलेल्या स्त्रीयांच्या प्रतिमा आहेत. ही लेणी करण्याचा उद्देश भिक्खू प्रवासी, व्यापारी यांच्या निवास स्थानाकरिता कोरल्या असाण्यात.

**सारांश** – एकदंरीत चंद्रपूर जिल्यातील स्थापत्यकलेचे भारतीय इतिहासात महत्वाचे स्थान आहे. शैलगृहे दुसऱ्या ते आठव्या शतकापर्यंत सतत कोरली गेली होती. बौध्द शैलगृहे महायान आणि हिनयान रुपात दिसतात. कुनघाडा माना, देऊळवाडा, आणि घुग्गुस येथे बौध्द भिक्खूच्या निवासाकरिता विहार कोरलेली दिसते. परतुं याचबरोबर भटाळा आणि गवराळा येथील शैलगृहावरून शैव, वैष्णव, सौर गाणपत्य आणि शाक्त पंथाच्या लेणीचे दर्शन घडते. यावरून आपणास दिसते की, चंद्रपूर जिल्हयात बौध्द, जैन, हिंदू यांच्या उपासना वच पूजनाचे तीर्थक्षेत्र होते. परतूं चंद्रपूर जिल्हायाच्या पुरातत्वीय शैलगृह सांस्कृतिक इतिहास मूर्तीशासत्रावर संशोधन व विवेचन होणे काळाची गरज होती.

**संदर्भ** –

*बोरकर डॉ. र रा – चंद्रपूर – गडचिरोली जिल्हयाचे पुरातत्व (प्रागैतिहासिक काळ ते इ.स. १३ वे शतक) सुयश प्रकाशन, नागपूर २००९.*

*साकालिया ह. धी आणि म.श्री माटे (संपा) – महाराष्ट्रातील पुरातत्व 'प्रागैतिहासिक महाराष्ट्र खंड १६ पुणे १९६५.*

*देव शां.भा – मार्कन्डी टेम्पल्स, नागपूर विद्यापीठ, १९७३*

*काटकर तु. ना – चंद्रपूर नगरपालिका शताब्दी ग्रंथ – १९६७*

*जुल्मे टी.टी – माणिकगड, गडचादुंरचा प्राचीन इतिहास, चंद्रपूर १९९९*

*मेश्राम प्रदिप – विदर्भातील बौध्दधम्माचा इतिहास शिल्पा प्रकाशन, नागपूर २०००*

*राजूरकर अ.जा. – चद्रपूरचा इतिहास, महाकाली प्रकाशन १९८१-८२ चंद्रपूर.*